# महाराष्ट राज्य विद्युत वितरण कंपनी लि.
# कोकण परिमंडळ कार्यालय
# ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी

**ग्राहक तक्रार क्र. ३४/२००९** **दि. १६/०३ /२००९**

| | |
|---|---|
| १) श्री. सुभाष रघुनाथ सरदेसाई<br>मु. पो.कसबा (संगमेश्वर)<br>ता. संगमेश्वर<br>जि. रत्नागिरी.<br>फो. नं. (०२३५४)२५२२७५ | तक्रारदार ग्राहक |

*विरुध्द*

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता<br>स व सु विभाग,<br>विभागिय कार्यालय रत्नागिरी. | विरुध्द पक्षकार |

| | |
|---|---|
| फोरम उपस्थिती | १) श्री. डि. एस्. जामखेडकर<br>अध्यक्ष<br>२) श्री. जे.एल. सोनवणे<br>कार्यकारी अभियंता<br>व सचिव<br>३) श्री.एन.ए.कुलकर्णी<br>सदस्य |
| ग्राहकाच्या वतीने | ग्राहक स्वत: आणि प्रतिनिधी<br>श्री. ज.पु. बिवलकर |

**विरुध्द पक्षकाराच्या वतीने**

**१) कार्यकारी अभियंता (प्रशासन) रत्नागिरी**
**श्री. डी. एस्. कांबळे**

**२) सहा. अभियंता कार्यालय**
**रत्नागिरी श्री. नारायण वामन**
**आजगांवकर**

**३)सहाय्यक अभियंता संगमेश्वर**
**उपविभाग. संजय किसन सोनवलकर**

**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग ग्राहक तक्रार निवारण मंच व लोकपाल(ओम्बुडसन) विनिमय २००३ मधील ८(२) चे तरतुदीनसार :**

श्री. सुभाष रघुनाथ सरदेसाई तक्रारदार ग्राहक याचे औदयोगिक Ltv- ३७ hp कनेक्शन असून ग्राहक क्रमांक २२४८३००००९३९ असा आहे.वीज पुरवठयाबाबत २९.१०.०८ ते २८.१२.०८ या कालावधीतील देयका सोबत पावर फॅक्टर पेन्लटी आकारणी झाल्यामुळे तक्रार ०३.०१.०९ रोजी अंतर्गत ग्राहक तकार निवारण कक्षाकडे दाखल केली असताना त्यांचे उत्तर कक्षाकडील कार्यकारी अभियंता प्रशासन यांचे पत्र क्रमांक १२१३ दि. २६.०२.०९ नुसार प्राप्त झाले असता तकारीचे निराकरण न झाल्याने ग्राहकांने आपली तक्रार अनुसुचि 'अ' या विहीत नमुन्यात दि. १६ मार्च ०९ रोजी आवश्यक त्या तपशिलासह मंचाकडे दाखल केली असून ती नियमाप्रमाणे आहे. तकार दाखल होताच मंचाकडील पत्र कमांक ४४९ दि. १७.०३.०९ च्या पत्रानुसार कार्यकारी अभियंता विभागिय कार्यालय रत्नागिरी यांच्याकडून स्पष्टीकरण मागविण्यात आले तथापि विभागीय कार्यालयाकडून विहीत कालावधीत स्पष्टीकरण प्राप्त न झाल्याने केसच्या सुनावणीची नोटीस ०९एप्रिल ०९ रोजी पाठविण्यात येवून सुनावणी २१ एप्रिल ०९ रोजी घेण्यात आली. सुनावणी दिवशीच विभागीय कार्यालयाचे लेखी म्हणणे पत्र कमांक २४३७ दि. २१ एप्रिल २००९ रोजी प्राप्त झाल्याने त्याची प्रत ग्राहक्रांस देण्यात आली. सुनावणी कालावधीत उभय बाजूनी युक्तीवाद करण्यात येवून तकारीचे स्वरूप व अन्य तपशीलाचा परामर्श घेण्यात आला.

ग्राहकांच्या तकारीचे स्वरूप असे की, ग्राहकांच्या Lt कनेक्शनबाबत २९.१०.०८ ते ३०.११.०८, ३०.११.०८ते २८.१२.०८ या कालावधीची देयके आली असता त्यामध्ये अनुकमे रूपये ५७०२ व रू. ६०६३ इतकी पावर फॅक्टर पेनॅल्टी लावण्यात आली असून ती रद्द करण्यात यावी तसेच आयोगाची संमती मिळणे अगोदर वसूल केलेला मागणी आकार व TOD टॅरिफ व्याजासकट परत करण्यात यावा. महावितरणच्या परिपत्रक कमांक ६२ नुसार १००% ग्राहकाकडे MD मीटर बसवल्या नंतरच Lt MD टॅरिफ लागू होत असल्याचे नमुद केले असून तसा दाखला नियामक आयोगाला सादर करणे महावितरणला बंधनकारक आहे. असे असतानाही टॅरिफ आकारणी झाली असून ती नियम बाहय आहे. नियामक आयोगाच्या विनिमय २००५ मधील तरतुदीनुसार ३ महिन्यापेक्षा कमी नाही.इतकी मुदत देणे अपेक्षित असताना ती ही देण्यात आलेली नाही. टॅरिफ बदलासाठी जाहीर नोटीस ही दिलेली नाही. बसवलेल्या मीटरबाबतही रिडींग उपलब्ध झालेले नाही. पेन्लटी वगळता उर्वरित रक्कम भरण्यात आली असून कोणतीही थकबाकी नाही. कॉन्टक्ट डीमांडच्या आधारे मंजूर भाराच्या ५०% इतक्या भारावर प्रती Hp रू. ६० आकारणी करणे आवश्यक असताना माझ्याकडून रू. ९० प्रति देयक वसुल करण्यात आले आहेत. MD मीटर बसविला आहे म्हणून MD आधारेच बीलींग करणे चुकीचे असून आयोगाच्या आदेशाचे पालन झालेले नाही. तकारीतील हे सर्व मुद्दे विचारात घेता ग्राहकांच्या म्हणण्यानुसार आयोगाच्या आदेशाशी विसंगत अशी केलेली वसुली व्याजासहीत परत मिळावी २९.१०.०८ ते २८.१२.०८ व त्यापुढील पावर फॅक्टर पॅन्लटी ती रद्द करण्यात यावी व अन्य बाबतीत उचित आदेश व्हावा.

सुनावणी कालावधीत उभय बाजूनी तपशीलवार युक्तीवाद करण्यात आलाआणि ग्राहकांच्या म्हणण्यानुसार मीटर सुव्यवस्थित नसल्याने रिडींग घेता आलेले नसून पॉवर फक्टर पॅन्लटी लावण्याबाबत ही नियमाचे उल्लघंन्न झालेले आहे. बील भरल्यानंतर ही निर्णय देण्यात आलेला नाही. मीटर टेस्टींग करून ही त्याचा अहवाल उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. नियामक आयोगाच्या आदेशाचे उल्लघंन झाले असून MD मीटर आधारीत केलेली आकारणी पुर्णपणे गैर लागू आहे. सबब नोटीस न देता लावण्यात आलेली पॉवर फॅक्टर पेन्लटी रद्द करण्यात यावी. टॅरिफ आकारणी चुकीची असल्याने तीही बदलण्यात यावी आणि केलेली वसुली सहव्याज मिळावी असेही प्रतिपादन करण्यात आले.

महावितरणच्या वतीने युक्तीवाद करताना नमुद करण्यात आले की, कोणत्याही तकारीकरिता महावितरण कार्यालयाकडील योग्य त्या अधिकाऱ्याशी संपर्क झाला पाहीजे पॉवर फॅक्टरबाबत कॅपसिटर हा भाग महत्वाचा असल्याने तो मान्यता प्राप्त असावा लावण्यात आलेल्या पेन्लटी करिता नोटीस दिलेली नसली तरी सुद्धा ग्राहकांने योग्य त्या अधिकाऱ्याशी संपर्क केला असता तर योग्य तो खुलासा मिळाला असता असे हि स्पष्ट करण्यात आले.नियामक आयोगाचे परिपत्रक व अनुषगीक माहीती मिटर बसवितानाच ग्राहकांला देण्यात आले असून बसविलेला MD हा मार्च २००८ पूर्वीचा आहे. प्रकरण अंतर्गत कक्षाकडे आल्यामुळे दंड न भरता बील भरण्याबाबत कळविण्यात आले होते. उभय बाजूनी कागदपत्रे दाखल करण्याकरिता कालावधी मागितल्याने तो देण्यात आला आणि त्यानुसार ग्राहकांकडील पुढील तपशिल आवश्यक त्या कागदपत्रासह २७ एप्रिल रोजी दाखल करण्यात आले आणि महावितरणने आपला पुढील लेखी युक्तीवाद आवश्यक त्या कागदपत्रासह दि. ३०.०४.०९ रोजी पत्र कमांक २५५२ नुसार दाखल करण्यात आला. उभय बाजूच्या म्हणण्याच्या प्रती पक्षकाराना देण्यात आल्या.

या तकार प्रकरणात उभय बाजूनी केलेला युक्तीवाद, दाखल करण्यात आलेली विविध कागदपत्रे संबधित विषयाचा तपशिल इत्यादी विचारात घेता प्रामुख्याने पॉवर फॅक्टर पेन्लटी आणि लावण्यात आलेले टॅरिफ तसेच इनस्टॉल केलेल्या मीटरबाबत ग्राहकांनी उपस्थित केलेल्या शंका याबाबतच तकार करण्यात आलेली आहे. नियामक आयोगाने वेळोवेळी दिलेल्या डायरेक्टीव्हजनुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी महावितरणची आहे आणि ती कोणत्याही परिस्थितीत नाकारता येत नाही.या प्रकरणात दाखल करण्यात आलेले व्यापारीपरिपत्रक कमांक ८० दि. १०.०२.०८ हे बदललेल्या टॅरिफबाबत असून त्याची अमंल बजावणी म्हणजेच इफेक्टीव्ह डेट १ जून २००८ असून अंमल बजावणी कालावधी ३१ मार्च २००९ पर्यत आहे. याच परिपत्रकानुसार पॉवर फॅक्टर विषयी मार्गदर्शक तत्वे दिलीली असून परिपत्रकाप्रमाणेच "Whenever the average p.f. is less than ०.९, penal charges shall be levied at the rate of २% (Two percent) of the amount of monthly bill including energy charges, fac and fix/demand charges." संबंधित सर्क्युलर हे नियामक आयोगाकडील केस नं. ७२ of २००७ संदर्भातील असून तसा खुलासा वेळोवेळी महावितरणच्या मुख्य कार्यालयाकडुन करण्यात आलेला आहे. याच पेन्लटीबाबत नियामक आयोगाने निश्चित केलेल्या वीज पुरवठयाच्या अटी शर्ती २००५ मधील नियमावली कमांक १२ नुसार सरासरी पॉवर फॅक्टर आणि नियामक आयोगाच्या आदेशाचा स्पष्ट उल्लेख असून या नियमावली अंतर्गत १२.२ नुसार - The Distribution Licensee may require the consumer within a reasonable time period, which shall not be less than three months, to take such effective measures so as to raise the average power factor or control harmonics of his installation to a value not less than such norm in accordance with Regulation १२.१ above: या नियमावली नुसारच अशीही तरतुद आहे की, डीस्टीब्युशन लायसन्सी, Distribution licensee may charge penalty or provide incentives, for low/ high power factor and for harmonies, in accordance with relevant orders of the commission. नियमावली कमांक १२.१ तसेच १२.२ अतिशय सुस्पष्ट असून त्याकरीता वेगळया स्पष्टीकरणाची गरज नाही. पॉवर फॅक्टर आणि दंडात्मक कारवाई म्हणजेच Subject to या धरतीवर असून त्यामध्ये त्याची सूचना ग्राहकांला देणे किंबहूना तशा अर्थाची नोटीस पाठविणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.याच नियमाचा आधार घेवून संगमेश्वर उपविभागाने माहे जानेवारी २००९ च्या रिंडींग अनुषंगाने अशी नोटीस / सुचना पत्र कमांक - दि. १३.०२.०९ च्या पत्रानुसार ग्राहकांला दिलेली आहे आणि विदयुत जोडणीतील कॅपसिटरमुळे आपल्याला आर्थिक दंड

बसणार नाही असे स्पष्ट करण्यात आले. म्हणजेच संबधित सहाय्यक अभियंता संगमेश्वर उपविभाग यांनी नियामक आयोगाच्या १२.२ नियमावलीचे तंतोतंत पालन केले असून हिच तत्परता मात्र २९.१०.०८ ते ३०.११.०८ व ३०.११.०८ ते २८.१२.०८ या कालावधीतील पॉवर फॅक्टर बाबत मात्र दाखविण्यात आलेली नाही. किंबहूना कोणतेही स्पष्टीकरण याबाबत देण्यात आलेले नाही.महावितरणची ही कृती पुर्णपणे विसंगत आहे. १३.०२.०९ च्या पत्राने ग्राहकांला नोटीस दिली असून आवश्यक त्या नियमाची पुर्तता सुद्धा केली आहे. पण हिच दक्षता पेन्लटी लावण्यात आलेल्या बीलाबाबत किंवा नमुद केलेल्या पॉवर फॅक्टरबाबत घेण्यात आलेले नाही. एकाच ग्राहकांच्या वेगवेगळया कालावधीकरता एकाच नियमाचा दोन वेगळया प्रकारे अर्थ लावणे कायदा आणि नियमावलीला अभिप्रेत नाही आणि त्यामुळेच आकारण्यात आलेला दंड अ. क्रमांक ५७०२,०६०६३ पूर्णपणे चुकीची असून पुर्णपणे नियम बाहय आहे. सदरहू पेन्लटी रक्कम ग्राहकांला परत करणे नियमानुसार ठरणारे असल्याने ती रक्कम व्याजासहित परत करणे महावितरणवर बंधनकारक आहे. नियामक आयोगाने निर्देशित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसारच आणि वेळोवेळी जाहीर केलेल्या आदेशानुसारच होणे केवळ गरजेचे नसून त्याची कार्यवाही सुद्धा प्रचलित नियमानूसार होणे संध्याच्या व्यवस्थेला अभिप्रेत आहे. ग्राहकांने दाखल केलेल्या कागदपत्रावरून आणि महावितरणच्या कनिष्ठ अभियंता कसबा सेक्शन पत्र कमांक २८८ दि. ३१.१२.०८च्या पत्रावरून ही कपॅसिटर बदलल्याची बाब कळविण्यात आली आहे. ग्राहकांने याबाबत कोणत्याही नियमाचे उल्लघंन केल्याचे आढळून आलेले नाही. महावितरणने कोल्हापूर झोन कडील दाखल केलेली केस ही नियमावलीच्या कार्यवाहीचा भाग असून संबधित कार्यालयाने नोटीस पाठविल्याचे समर्थन केलेले आहे. त्यामुळे केस प्रकरण २७६/०८ ते २८६/०८ दि. १६.०३.०९ या तकार प्रकरणास लागू होत नाही. कींबहूना संबंधित केसच महावितरणला मार्गदर्शक ठरू शकेल.

या प्रकरणात ग्राहकांकडून उपस्थित करण्यात आलेला दुसरा मुद्दा म्हणजे आयोगाची संमती मिळण्या आधी वसुल केलेला मागणी आकार व TOD टॅरिफ की ज्याची अमंल बजावणी चूकीच्या पद्धतीने करण्यात आलेली आहे. या संदर्भात व्यापारी परिपत्रक कमांक ६२ महत्वाचे असून माननिय लोकपालाच्याकडे झालेली केस कमांक (६६/०८) महत्वाची असून ती या प्रकरणास लागू होत आहे. याच विषयाबाबत आयोगाने निर्णय दिलेली केस कमांक (६४/०८) महत्वाची असून आयोगाने स्पष्टपणे नमूद केली आहे की १००% MD Metering हे ३१ मार्च २००७ पर्यत पूर्णकरणे गरजेचे असून ते न झालास महावितरणला MD based tariff नुसार आकारणी करता येणार नाही अशा बाबतीत जुन्या पद्धतीने म्हणजेच सॅन्कशन लोडच्या आधारे आकारणी केली जावी.

माननीय लोकपालानी केस कमांक ६६/०८ मध्ये ही याच बाबतीत स्पष्ट केले असून १००% Installation MD Meter चे झालेनंतर MD based tariff प्रमाणे आकारणी करण्याचे स्पष्ट केले आहे. माननीय लोंकपालाच्या या आदेशानुसारच महावितरणला सुमोटो पद्धतीने आकारणी करता येणार नाही. परिपत्रकानुसारही त्याची अंमलबजावणी ०१.०६.०८ पासून आहे. माननीय नियामक आयोग आणि लोकपाल यानी याबाबतीत दिलेल्या डायरेक्शनस स्पष्ट असल्याने अधिक भाष्य करण्याची कोणतीही आवश्यकता मंचास वाटत नाही. १००% MD Metering बाबत महावितरणने दाखल केले. मुख्य कार्यालयाकडील सर्टीफीकेट कमांक ३०५५१, १ ऑगस्ट २००८ या तारखेचे आहे. नियामक आयोगाच्या आदेशानुसार इफेक्टीव्ह डेट १ ऑगस्ट च्या पूर्वीची होऊ शकत नाही, त्यामुळेच MD based tariff ची अंमल बजावणी १ ऑगस्ट २००८ पासून करणे अधिक संयुक्तीक आहे. प्रस्तुत प्रकरणात अश्या पध्दतीची आकारणी केली असल्यास महावितरणने १ ऑगस्ट २००८ पूर्वी आदाकेलेल्या बिलाबाबत पुन्हा तपासणी करून नियामक आयोगाच्या मंजूरीशिवाय मागणी आकार तसेच TOD Tariff लावला असल्यास तो परत करण्याची कायदेशीर जबाबदारी महावितरणचीच आहे. या आकारणीबाबत ग्राहक आणि महावितरण यांनी पुन्हश्च एक वार आढावा घेवून माहीती उपलब्ध करून दिल्यास टॅरिफची आकारणी व त्या कालावधीतील देयक नियमानुसार करता येतील. नियामक आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे याची आकारणी केली जावी आणि ज्यादा वसुल केलेली रक्कम ग्राहकाला परत करण्यात यावी. वरील सुत्रानुसारच मागणी आकार चुकीच्या पध्दतीने लावले असून त्याचा हिशोबही मंजूर भाराच्या ५०% इतक्या भारावर प्रति HPरू. ६०प्रमाणे आकारणी करणे गरजेचे आणि नियमानुसार असताना प्रत्येक देयका पोटी रू.९० ची आकारणी करण्यात आलेली आहे. टॅरिफ आकारणीची दुरूस्ती करताना या आकाराबाबत ही नियमानुसार आकारणी ग्राहकास परत करण्यात यावी. याबाबतीत मा. लोकपाल आणि नियामक आयोग यांचे

आदेश आणि संबंधित केसेसमधील मार्गदर्शक तत्वे बंधनकारक असल्याने योग्य तो परतावा. ग्राहकाला देण्याची जबाबदारी महावितरणला नाकारता येत नाही. या बाबतीत दिलेल्या देयका बाबतीत पुर्णपणे रिकन्सीलेशन करून योग्य आकारणीची देयकेदेण्यात यावीत.

आकारणीच्या पध्दतीत बदल झाल्यामुळे तसेच MD मीटर बसविल्यानंतर तांत्रिक बाबीची शहानिशा उपलब्ध करून देणे यांची जबाबदारी महावितरणच्या वरिष्ठ कार्यालयाची आहे. ग्राहकांचे वर्गीकरण पाहता अशा ग्राहकांना पुढे अधिक सहकार्य केल्यास तकारीचे निवारण होऊ शकते. मीटर रिंडींग ग्राहकांला कळणे आवश्यक असल्याने तशी सुविधा उपलब्ध करून दिली गेली नाही. संगमेश्वर उपविभाग संगळयाच बाबतीत सक्षम असेल असे संभवत नाही आणि अशा ग्राहकांच्या बाबतीत तकार उद्‌भवू नये या करता उपाय योजनाआवश्यक असताना, ती केल्याचे दिसून आलेले नाही. ग्राहकांला मनस्ताप आणि पाठपुरावा करण्याचे परिश्रम झाल्याने आणि अंतर्गत कक्षाकडून वेळीच उपाययोजना न सुचविल्याने तकार उद्‌भवल्यापासुन ६ महीन्याहून अधिक काळ झालेला आहे आणि त्यामुळेच ग्राहकांला झालेला त्रासाबद्दल योग्य तो खर्च भरपाई म्हणून देणे नियमानुसार होऊ शकते. तकारीचे स्वरूप पाहता आणि एकूण कालावधी विचारात घेता. रुपये १०००/- यापोटी ग्राहाकाला देण्यात यावेत. वीज शुल्काबाबत देयकामध्ये डयुटीची रक्कम रुपये ८४६/- लावण्यात आलेली आहे या बाबतचा संपुर्ण खुलासा महावितरणने पत्र कमांक २५५२, दि. २९ एप्रिल २००९ च्या पत्रानुसार केला असून नियामक आयोगाकडील केस कमांक ४२/०८ चा आधार घेतला असून त्यामध्ये ASCया रक्कमेचा ही समावेश आहे. काही तांत्रिक अडचणीमुळे संबंधीत रक्कम बिलामध्ये वेगळी दिसत नाही ही वस्तुस्थिती आहे तथापि करण्यात आलेली आकारणी नियमानुसार आहे. या बाबतीत महावितरणचा खुलासा योग्य असून डयुटी या नावाखाली लावणेत आलेली रक्कम रु. ८४६/- कायम करणेत आहे आणि यामध्ये कोणताही फेरफार करण्याची आवश्यकता नाही. या बाबतीतील ग्राहकांच्या हरकती फेंटाळण्यात येत आहेत.

प्रस्तुत तकार प्रकरणात उभय बाजूचा युक्तीवाद, दाखल करण्यात आलेला तपशील, अनुंषगिक कागदपत्रे इत्यादी विचार घेता मंचाने वरिलप्रमाणे निष्कर्श काढला असून यानुसार खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

**१) ग्राहकांच्या ALT कनेक्शनबाबत २९.१०.०८ ते ३०.११.०८ आणि ३०.११.०८ ते २८.१२.०८ या कालावधीतील देयकात आकारणी करण्यात आलेली पॉवर फॅक्टर पेन्लटी नियम बाहय असल्याने ती रद्द करण्यात येत आहे. आणि या दंड आकारणी पोटी वसुल करण्यात आलेली रक्कम रुपये ५७०२ आणि रु. ६०६३ ग्राहकांला परत करण्यात यावी. या रक्कमेवर वसुल केलेल्या तारखेपासुन ८% दराने व्याज देण्यात यावे दंड आकारणी व्याजासहीत, हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात देण्यात यावी.**

**२) मागणी आकार TOD Tariff याची आकारणी लागू असलेला कालावधी म्हणजेच ०१.०८.०८ पासून करण्यात यावा आणि या तारखेपूर्वी जर वसूली करण्यात आलेली असेल तर वसुली देयकाचा ताळमेळ घातल्यानंतर परत करण्यात यावी. आदेश मिळाल्यापासून ३० दिवसामध्ये याची पुर्तता करुन अहवाल मंचाकडे सादर कराव**

**३) तकारीचा पाठपुरावा करण्यात आलेला खर्च आणि विलंबाचा कालावधी इत्यादी करीता ग्राहकांला रुपये १०००/- भरपाई म्हणून देण्यात यावेत आणि ही रक्कम आदेश मिळाल्यापासून ३० दिवसात देण्यात यावी महाावितरणने आकारणी केलेली डयुटीची रक्कम रुपये ८४६/- कायम करणेत येत असून याबाबतीतील ग्राहकांच्या हरकती फेटाळण्यात येत आहेत.**

४) या आदेशा विरूध्द तकारदारास अपिल करावयाचे असल्यास आदेश मिळाल्यापासून ६० दिवसाचे आत अपिल करता येईल.

५) या आदेशाची कार्यवाही आदेश मिळाल्याच्या तारखेपासून ४० दिवसामध्ये करावयाची असून पूर्तता अहवाल मंचाकडे सादर करावयाचा आहे.

पत्ता :-

सचिव,
लोकपाल महाराष्ट्र राज्य
विदयुत नियमक आयोग
६०६/६०८ केशवा बिल्डींग/
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स मुबंई ४०००५१
फोन नं. ०२२ / २६५९२९६५

| | |
|---|---|
| श्री. डि. एस. जामखेडकर | श्री. एन. ए. कुलकर्णी |
| अध्यक्ष | सदस्य |
| ग्राहक तक्रार निवारण मंच | ग्राहक तक्रार निवारण मंच |
| कोकण परिमंडळ रत्नागिरी | कोकण परिमंडळ रत्नागिरी |

दिनांकः-
ठिकाणः- रत्नागिरी

I, the undersigned in my capacity of Executive Engineer / Secretary of this Forum do not agree with the above order (pt. No. 1&3 ) My separate opinion is produced below which forms the part of this order.

1) In the case No.72/2007 of MERC Operative Order for APR of MSEDCL for F.Y. 2007-2008 in case of power factor penalty for LT-V category consumers, **whenever** the average P.F. is less than 0.9, penal charges shall be levied at the rate of 2% of the amount of monthly bill. This has also been mentioned in the Comm. circular No. 80 dt. 10.06.08. As per the content in the order the word **whenever** itself specifies that during that month when the P.F. comes less than

0.9, prescribed penalty has to be levied. Whenever the P.F. is above 0.9, the incentive has also to be awarded. The rationale behind this is the consumer should be aware of the Demand side Management and take necessary precaution and application for utilization of proper share of energy.

Here Maha-vitaran has acted as per conditions of supply Cl.No. 12.1 & case No . 12 of 2007 of MERC. Hence the undersigned is of the opinion that in this case refund cannot be given to the consumer regarding P.F. penalty.

2) As the matter refund of penalty is ruled out, the point of paying towards cost of the case and delayed period does not arise.

J.L.Sonawane
Ex.Engineer
Secretary
C.G.R.F.(KZR)
Ratnagiri.

Place:-Ratnagiri
Date:-